# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांक:- ०३/०३/२०१७

## *एम.पी.डी.ए. अंतर्गत अवैध दारू विक्रेता संजय रत्नावार १ वर्षाकरीता स्थानबध्द*

- **सल्लागार मंडळाने सदरचा आदेश केला कायम**

अवैध दारु विक्रेता संजय राजय्या रत्नावार, वय ४८ वर्ष, रा. अहेरी, ता. अहेरी, जिल्हा गडचिरोली याचेवर महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले व औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व द्रकदाव्य कलाकृतीचे बिनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हीडीओ पायरेटस) वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती याच्या विषयक कृत्यांना आळा घालण्ययाठी अधिनियम १९८१ (सुधारण २०१६) चे कलम ३ (१) अन्वये स्थानबध्देची कार्यवाही करणे आवश्यक झाले होते. स्थानबध्द संजय राजय्या रत्नावार याचे गुन्हेगारी अभिलेख पाहता सदर इसम गडचिरोली जिल्हयात अवैध दारु वाहतुक करणे, बाळगणे व विक्री करणे अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करीत असल्याने त्याचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम सन १९४९ अन्वये एकुण २६ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी १२ गुन्हे न्यायालयात प्रलंबित आहेत. संजय राजय्या रत्नावार याचेवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम सन १९४९ चे कलम ९३ अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आलेल्या आहेत. जिल्हयात १०० टक्के दारुबंदी व्हावी याकरीता दारुबंदी सदराखालील दाखल गुन्हे अजामिनपात्र केले असतांना सुध्दा सदर स्थानबध्द इसमाने अवैध दारु विक्रीचा व्यवसाय सोडला नसल्यामुळे त्याचे विरुध्द स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे.

गडचिरोली जिल्हयाचे मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो. यांनी अशा प्रकारच्या इसमाविरुध्द एम.पी.डी.ए. अंतर्गत स्थानबध्देची कार्यवाही करण्याबाबत अहेरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. संजय मोरे यांना निर्देश दिल्याने त्यांनी संजय राजय्या रत्नावार या स्थानबध्द इसमाविरुध्द केलेल्या स्थानबध्दतेच्या प्रस्तावास मा. ए.एस.आर. नायक जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांनी मान्यता दिल्याने स्थानबध्द इसमास दिनांक २५/०१/२०१७ रोजी स्थानबध्द करुन जिल्हा कारागृह चंद्रपुर येथे दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर सदर प्रकरण हे सल्लागार मंडळाकडे गेल्यानंतर सल्लागार मंडळाने संजय रत्नावार याचा स्थानबध्द आदेश कायम करत सदरची कारवाई योग्य असल्याचे सांगितले आहे.

एम.पी.डी.ए. कायदयाअंर्गत जिल्हयातील इतर अवैध दारु विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.